# ॥ आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली ॥

माहे मार्च - २०१९ च्या जाहिरातीनुसार जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील आरोग्य विभागाशी संबधित गट - क संवर्गातील सर्व पदे भरण्याबाबत जाहिरात क्रमांक : ०१/२०१९ दिनांक ०१/०३/२०१९,
जाहिरात क्रमांक ०१/२०२१ दिनांक २७/०८/२०२१ व दिनांक २७/०८/२०२१ रोजीच्या जाहिर प्रकटनाच्याच्या अनुषंगाने
शुध्दीपत्रक दिनांक ०५/०९/२०२१.

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली अतंर्गत जाहिरात क्रमांक : ०१/२०१९ दिनांक ०१/०३/२०१९, जाहिरात क्रमांक ०१ दिनांक २७/०८/२०२१ व दिनांक २७/०८/२०२१ रोजी जाहिर प्रकटन प्रसिध्द करण्यात आलेले आहे. ग्रामविकास विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक संकीर्ण - २०२०/प्र.क्र.९९/आस्था-८, दिनांक ०१ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकातील दुरुस्तीस अनुसरुन अवर सचिव, ग्रामविकास विभाग, मुंबई यांचे पत्र क्र-संकीर्ण-२०२०/प्र.क्र.९९/आस्था-८/ दिनांक ०२ सप्टेंबर, २०२१ अन्वये आदेशीत केल्यानुसार आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली अतंर्गत जाहिरात क्रमांक ०१ दिनांक २७/०८/२०२१ व दिनांक २७/०८/२०२१ रोजीच्या जाहिर प्रकटनास अनुसरुन सदर जाहिरातीमध्ये व जाहिर प्रकटनामध्ये खालील प्रमाणे शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात येत आहे.

ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण - २०२०/प्र.क्र.९९/आस्था-८/ दि.१४.०६.२०२१ मधील परिच्छेद क्रमांक ०१ (०६) मध्ये आरोग्य विभागाशी संबधित, औषध निर्माता, आरोग्य सेवक (पुरुष) (४०% सरळसेवा), आरोग्य सेवक (पुरुष) (५०% हंगामी फवारणी कर्मचारी), आरोग्य सेवक (महिला) या संवर्गातील प्रत्येक सवंर्गाची परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार असल्याने आता उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदेमध्ये परिक्षेकरिता उपस्थित राहता येईल. तसेच, उमेदवाराने एका जिल्हा परिषदेमध्ये एका पेक्षा जास्त पदांसाठी यापूर्वी अर्ज सादर केले असतील तर, संबधित उमेदवारास संबधित जिल्हा परिषदेमधून एकापेक्षा जास्त पदांसाठी परीक्षा देता येईल. याअनुषंगाने परिक्षेस पात्र उमेदवाराने यापुर्वी त्याने सादर केलेल्या अर्जानुसार कोणत्या जिल्हा परिषदेमधून परिक्षेस बसणार आहे याबाबतचा विकल्प देणे बंधनकारक असेल.

**तसेच**

ग्रामविकास विभाग, शासन शुध्दीपत्रक, क्रमांक संकीर्ण - २०२०/प्र.क्र.९९/आस्था-८/दि.२०.०८.२०२१ सोबतच्या विवरणपत्र अ मधील मुद्दा क्रमांक ०५ खालील प्रमाणे आहे.

माहे मार्च, २०१९ च्या जाहिरातीनुसार ऑनलाईन परिक्षेकरिता उमेदवारांना एक किंवा एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांसाठी अर्ज करण्याची मुभा होती. तथापी, आता शासनाचे महापरिक्षा पोर्टल रद्द झाल्याने सदरची आरोग्य विभागाशी संबधित पदभरती ही OMR Vendor मार्फत Offline पध्दतीने राबविण्यात येणार असलयाने उपरोक्त संवर्गातील प्रत्येंक संवर्गाची परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदेमधून परीक्षा देता येईल. यासाठी ज्या उमेदवारांनी एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमध्ये रिक्त पदांकरिता अर्ज सादर केले आहेत, अशा उमेदवारांनी परिक्षेकरिता एकाच जिल्हा परिषदेचा विकल्प वरिलप्रमाणे नमूद संकेतस्थळावर दिनांक ०१ सप्टेंबर, २०२१ ते दिनांक १४ सप्टेंबर २०२१ या कालावधीपर्यंत नोंदविणे आवश्यक राहील.

याऐवजी

१. “माहे मार्च, २०१९ च्या जाहिरातीनुसार ऑनलाईन परिक्षेकरिता उमेदवारांना एक किंवा एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमधील एक किंवा अधिक संवर्गातील पदांसाठी अर्ज करण्याची मुभा होती.तथापि, आता शासनाचे महापरिक्षा पोर्टल रद्द झाल्याने सदरची आरोग्य विभागाशी संबधित पदभरती ही OMR Vendor मार्फत Offline पध्दतीने राबविण्यात येणार असल्याने उपरोक्त संवर्गाची परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदेमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून परीक्षा देता येणार आहे. तथापी औषध निर्माता, आरोग्य सेवक (पुरुष) (४०% सरळसेवा), आरोग्य सेवक (पुरुष) (५०% हंगामी फवारणी कर्मचारी), आरोग्य सेवक (महिला) संवर्गाच्या पदभरती संदर्भात घेण्यात येणा-या परिक्षेसाठीच्या प्रत्येक संवर्गाची प्रश्नपत्रिका सर्व जिल्हा परिषदांसाठी संवर्गनिहाय सामायिक राहणार आहे. त्यामुळे सन २०१९ च्या जाहिरातीनूसार ज्या उमेदवाराने एक किंवा एकापेक्षा अधिक संवर्गाच्या परिक्षेसाठी एकापेक्षा अधिक जिल्हा परिषदेमधून अर्ज भरलेले आहेत त्या उमेदवारांचे सर्व ठिकाणी भरलेले अर्ज ग्राह्य धरले जातील. अशा उमेदवारांबाबत त्याने प्रत्यक्ष एकाच जिल्हा परिषदेअतंर्गत आयोजित परिक्षेस उपस्थित राहून परिक्षा दिल्यानंतर सदर परिक्षेमध्ये त्याला प्राप्त होणा-या गुणांच्या आधारे त्याने ज्या ज्या जिल्हा परिषदेतून सदर पदभरतीसाठी अर्ज भरला आहे त्या त्या जिल्हा परिषंदाच्या सदर पदांकरिताच्या तयार होणा-या गुणवत्ता (प्रवर्गनिहाय) यादीमध्ये त्याचे नाव गुणवत्ता क्रमांकानूसार अतंर्भूत केले जाईल.”

२. तसेच, नव्याने समाविष्ट झालेले दिव्यांग प्रवर्ग व खुल्या प्रवर्गात नव्याने वाढ झालेल्या रिक्त जांगासाठी प्रसिध्द होणा-या जाहिरातीनूसार परिक्षेला बसू इच्छिणा-या उमेदवाराला विभागाच्या दिनांक २३.०७.२०१८ च्या शासन निर्णयानूसार एक किंवा एकापेक्षा अधिक जिल्हा परिषदांमध्ये पदांसाठी अर्ज करता येईल. तसेच एका उमेदवाराला एका किंवा अनेक संवर्गातील पदांसाठी अर्ज करण्याची मुभा राहील. परंतु, प्रत्येक पदासाठी त्याला स्वतंत्र परिक्षा शुल्क आकारले जाईल. तसेच, उमेदवाराने परिक्षेसाठी उपस्थित राहण्याकरिता जिल्हा परिषदेचा विकल्प देणे आवश्यक आहे. याबाबत, www.maharddzp.com या संकेतस्थळावर जाऊन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे उमेदवारास प्रवेशपत्र पाठविण्यात येईल. तसेच, सदर उमेदवारांबाबतही परिक्षा व गुणवत्ता यादीबाबतची कार्यपध्दती वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राहील,” असे वाचावे.

३. शासन शुध्दीपत्रक दिनांक २०.०८.२०२१ सोबतच्या विवरणपत्र “अ” मधील मुद्दा कमांक ०८ रद्द करण्यात येत आहे व विवरणपत्र “ब” मधील अ.क्र.२ मधून एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमध्ये अर्ज सादर केलेल्या उमेदवारांकडून जिल्हयाचा विकल्प घेणे” ही बाब वगळण्यात येत आहे.

उपरोक्त प्रमाणे शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात येत असुन याबाबत सर्व संबधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (सदस्य सचिव) | (सदस्य) | (अध्यक्ष) |
| जिल्हा आरोग्य अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी, | जिल्हा निवड समिती, |
| जिल्हा परिषद, हिंगोली | जिल्हा परिषद, हिंगोली | तथा जिल्हाधिकारी, हिंगोली |